आजरा पंचायत समिती (जि. कोल्हापूर) नवीन प्रशासकीय इमारत बांधकामास सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः पंसई-२०१६/प्र.क्र.२६४/बांधकाम-४
मर्झबान पथ, २५ बांधकाम भवन,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१
तारीख: २३ ऑक्टोबर, २०१७

वाचा :-

१) शासन निर्णय, ग्रा.वि.व ज.सं.वि.क्र.पंसई-२००९/प्र.क्र.१२२/पंरा-७, दि. ३१ ऑगस्ट, २००९

२) शासन निर्णय, ग्रा.वि.व ज.सं.वि.क्र.जिपई-२०१३/प्र.क्र.१२९/पंरा-७, दि. ०३ मार्च, २०१४

३) अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., कोल्हापूर यांचे पत्र क्र.जिप/बांखा/प्रकल्प-१/२३२७/१६, दि.२०.०८.२०१५ व पत्र क्र. जिप/बांखा/प्रकल्प-१/३०८८/१६, दि.२३.१२.२०१६

प्रस्तावना :-

१. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी वरील पत्रान्वये आजरा पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती केली आहे.

२. आजरा पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या रु. १,३४,४४,५००/- किंमतीच्या सविस्तर अंदाज पत्रकास दिनांक ३१.०८.२००९ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली असून प्रशासकीय मान्यते इतका पुर्ण निधी जिल्हा परिषदेला वितरीत करण्यात आलेला आहे. सद्य:स्थितीत इमारतीचे बांधकाम पुर्ण झालेले असून, इमारत कार्यालयीन वापरात आहे. आजरा पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीच्या अंतर्गत फर्निचर सुविधा व इतर उपकामाच्या रु. १४३.७२ लक्ष किंमतीच्या सविस्तर अंदाजपत्रकास दिनांक ०३.०३.२०१४ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. आजरा पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाची प्रशासकीय मान्यता सन २००८-०९ च्या दरसूचीवर आधारीत होती. व त्यानुसार या कामास तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. या कामी प्रत्यक्ष कामाची निविदा सन २०१०-११ च्या मंजूर दराशी तुलना करता १६.३० % इतक्या जादा दराने मंजूर केल्यामुळे, दरसूचीतील वाढीमुळे बांधकामाच्या किंमतीत वाढ झाली आहे. तसेच, स्टीलच्या परिमाणातील वाढीमुळे मंजूर आर सी सी संकल्पनेत झालेली वाढ झालेली आहे. या बाबींसाठी आजरा पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाच्या खर्चात एकूण रु. ३५,०७,४४३/- इतकी वाढ झालेली आहे. त्यामुळे अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी संदर्भीय पत्रान्वये रु. १,६९,५१,८७३/- इतक्या रकमेच्या सुधारीत अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती केली आहे.

३. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., कोल्हापूर यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्या छाननी अंती आजरा पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाकरीता रुपये रु. १,६९,५१,८७३/- लक्ष इतक्या रक्कमेच्या सुधारीत अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

४. आजरा पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाच्या मुळ प्रशासकीय मान्यता रुपये १,३४,४४,५००/- रक्कमेमध्ये रुपये ३५,०७,४४३/- इतकी वाढ करुन रुपये १,६९,५१,८७३/- (अक्षरी रुपये एक कोटी एकोणसत्तर लक्ष एक्कावन्न हजार आठशे त्र्याहत्तर हजार फक्त) इतक्या रक्कमेच्या सुधारीत अंदाजपत्रकास, या शासन निर्णयान्वये सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

५. आजरा पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाच्या मुळ प्रशासकीय व सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकाचा तुलनात्मक गोषवारा खालील प्रमाणे आहे:-

<u>पंचायत समिती आजरा नवीन प्रशासकीय इमारतीच्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा तुलनात्मक गोषवारा</u>

अ. क्र.	बाबीचा तपशिल	मुळ प्रशासकीय मान्यतेनुसार रक्कम (रु.)	सुधारीत प्रशासकीय मान्यता रक्कम (रु.)	बचत रक्कम (रु.)	अतिरिक्त रक्कम (रु.)
१	२	३	४	५	६
१	स्थापत्य काम	१०२६२९२४.००	११४६८७५०.००	०.००	१२०५८२६.००
२	विद्युतीकरण	११२८९२२.००	६३५१२५.००	४९३७९७.००	०.००
३	पाणी पुरवठा व मल:निस्सारण	८२१०३४.००	८२१०३४.००	०.००	०.००
४	भाववाढ	६१५७७५.००	१५४१७८३.००	०.००	९२६००८.००
५	संगणकीकरण	२०५२५८.००	२०५२५८.००	०.००	०.००
६	आकस्मिक खर्च	४१०५१७.००	४१०५१७.००	०.००	०.००
७	निविदा अधिक्य	०.००	१८६९४०६.००	०.००	१८६९४०६.००
	एकूण	१३४४४४३०.००	१६९५१८७३.००	४९३७९७.००	४००१२४०.००
	अतिरिक्त(६-५)			२६.०८%	३५०७४४३.००
	एकूण	१३४४४५००.००	१६९५१८७३.००		३५०७०००.००

६. उपरोक्त प्रशासकीय इमारत बांधकामासाठी संबधित सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतरच सहायक अनुदान स्वरुपात टप्प्या-टप्प्याने, उपलब्धतेनुसार अर्थसंकल्प वितरण प्रणाली (BDS) द्वारे निधी वितरीत करण्यात येईल. या कामी वितरीत करण्यात आलेला रु. १३४.४५ लक्ष निधी वजा जाता उर्वरीत रु. ३५.०७ लक्ष इतका निधी जिल्हा परिषदेला देय राहील.

७. प्रस्तुत कामात पुन:श्च कोणतीही भाववाढ यापुढे देय होणार नाही. सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत लेखे अंतिम करण्यात यावेत.

८. या कामावरील खर्च हा "२५१५-इतर ग्रामीण विकास कार्यक्रम १०१, पंचायती राज ३१ सहाय्यक अनुदाने (०१) (०३) जिल्हा परिषदांच्या इमारती बांधकामासाठी जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदाने (२५१५ ००५३)" या लेखाशिर्षाखाली मंजूर केलेल्या तरतूदीमधून खर्ची टाकण्यात यावा.

९. प्रस्तुतचा शासन निर्णय, वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उप विभाग- पाच, अ.क्र.९ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील प्रकरण ३, परि.क्र.१३४ खाली प्रशासनिक विभागास प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारास अनुसरुन तसेच, सार्वजनिक बांधकाम विभाग अनौ. संदर्भ क्र. २२२/१७/इमा-३ दिनांक ०२.०५.२०१७, नियोजन विभाग अनौ. संदर्भ क्र. १२०/१४४४, दिनांक १४.०८.२०१७ व वित्त विभाग अनौ. संदर्भ क्र. ४०८/२०१७/व्यय १५ दिनांक १६.०९.२०१७ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यांत येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१७१०२३११०९५३६६२० आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dilip Babasaheb Patil

Digitally signed by Dilip Babasaheb Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=82e461e0a32ec649f0a60e4372f7cbbb3edff433d33cc0d95db6f8dbf1fa4f7f, cn=Dilip Babasaheb Patil
Date: 2017.10.23 17:52:27 +05'30'

(दि.बा.पाटील)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. विरोधी पक्ष नेता विधानसभा/ विधानपरिषद
२) विभागीय आयुक्त पुणे विभाग, पुणे
३) महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई / महाराष्ट्र -२, नागपूर.
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर
५) अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर
६) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर
७) कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद कोल्हापूर
८) जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोल्हापूर
९) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
१०) उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा कोल्हापूर विभाग, कोल्हापूर
११) जिल्हा लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोल्हापूर
१२) सभापती, पंचायत समिती, आजरा, जिल्हा कोल्हापूर
१३) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, आजरा, जिल्हा कोल्हापूर
१४) वित्त विभाग - (व्यय-१५, अर्थ सं. -२) , मंत्रालय मुंबई ४०० ०३२
१५) नियोजन विभाग (का-१४४४) , मंत्रालय मुंबई ४०० ०३२
१६) सार्वजनिक बांधकाम विभाग, इमारती-३, मंत्रालय मुंबई ४०० ०३२
१७) निवड नस्ती कार्यासन बांधकाम-४, ग्रा.वि.व ज.सं.विभाग, बांधकाम भवन मुंबई